# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रायगड जिल्ह्यातील खोपोलीसह खालापूर तालुक्यातील बंद पडलेल्या कंपन्या पुर्ववत सुरु करण्याबाबत**

**(१) ७९७८ (०९-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खोपोलीसह खालापूर तालुक्यातील झेनिथ बिर्ला स्टील, के.डी.एल.बायोटेक या कंपन्यांसह लहान मोठ्या १५ कंपन्या बंद पडल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपन्या बंद पडल्यामुळे तालुक्यातील हजारो कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंद पडलेल्या कंपन्या पुर्ववत सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :** (१) मे. झेनिथ बिर्ला स्टील इंडिया प्रा. लि. व मे.के.डी.एल. बायोटेक लिमिटेड, सावरोली, या उद्योग घटकांच्या कंपनी व्यवस्थापनाने सन २०१३ मध्ये टाळेबंदी घोषित करुन उद्योग घटक बंद केले आहे.

सन २००७-२००८ या वर्षात चौथ्या अखिल भारतीय प्रगणनेनुसार खालापूर तालुक्यात एकूण लघु उद्योगांपैकी १०१ लघु उद्योग सुरु असल्याचे व १२० लघु उद्योग बंद असल्याचे आढळले आहे.

खालापुर तालुक्यातील सन २०१४-२०१५ पर्यन्त नोंदणी झालेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची एकूण संख्या ४४४ आहे व स्थिर भांडवली गुंतवणुक रु.४६६८५.०० लाख इतकी व रोजगार ९४१२ इतका आहे. व मोठया उद्योगांची एकूण संख्या ७४ इतकी आहे.

(२) कंपन्यांच्या व्यवस्थापनाने टाळेबंदी घोषित केल्यामुळे कामगार परिणामित झालेले आहेत.

(३) कंपनी व्यवस्थापन, कामगार युनियन व कामगार उप आयुक्त यांचेमध्ये चर्चा सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-नेरळ-कर्जत राज्य मार्गाच्या सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये एकपदरी रस्त्याच्या मध्ये बसविलेले सिमेंटचे ठोकळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२) ७९८१ (०९-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून कल्याण-नेरळ-कर्जत राज्य मार्गाच्या सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये एकपदरी रस्त्याच्या मधोमध बसविले जाणारे सिमेंटचे ठोकळे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून सिमेंट ठोकळे जागोजागी मोडलेल्या किंवा तुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर ठिकाणी दुभाजक म्हणून बसविण्यात येणारे सिमेंट ठोकळे नव्याने बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणातील ४८ लघु सिंचन प्रकल्प राज्य शासनाने रद्द केल्याबाबत**

**(३) ७९८२ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील ४८ लघु सिंचन प्रकल्प राज्य शासनाने नुकतेच माहे जाने, २०१५ मध्ये केले रद्द आहेत हे खरे काय,

(२) असल्यास, उक्त लघु सिंचन प्रकल्प रदद करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासंदर्भात शासन फेरविचार करणार आहे काय

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत ठाणे जिल्ह्यातील २, रायगड जिल्ह्यातील ७, रत्नागिरी जिल्ह्यातील ९ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १ अशा एकूण १९ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांच्या दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजीच्या संचालक मंडळाच्या ४८ व्या बैठकीत विषय क्र. ५ अन्वये महामंडळाचे आर्थिक दायित्व मर्यादित करण्याच्या हेतूने ठाणे मंडळांतर्गत उर्वरित २९ योजनांना प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या ठरावाद्वारे दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर महाराष्ट्र व औरंगाबाद प्रदेशातील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या व दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यत करण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरु झालेली नाहीत अशा सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून, योजना तांत्रिकदृष्ट्या योग्य/अयोग्य असल्याबाबतचा अहवाल महामंडळांतर्गत पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक मुख्य अभियंता तसेच जलसंपदा विभागाचा एक मुख्य अभियंता यांची समिती नियुक्त करुन सादर करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हा अहवाल महामंडळाच्या संचालकांच्या बैठकीमध्ये ठेवून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारकर्ली (जि.सिंधुदूर्ग) येथील महाराष्ट्र पर्यटन महामंडळाच्यावतीने उभारण्यात आलेली स्कुबा डायव्हींग सेंटरची इमारत अनधिकृत असल्याबाबत**

**(४) ७९९३ (०६-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारकर्ली (जि.सिंधुदूर्ग) येथील महाराष्ट्र पर्यटन महामंडळाच्यावतीने उभारण्यात आलेली स्कुबा डायव्हींग सेंटरची इमारत अनधिकृत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनधिकृत स्कुबा डायव्हींग सेंटरच्या नामांतरावर तोडगा अद्याप न निघाल्याने महाराष्ट्र पर्यटन केंद्रांच्या मनमानी कारभाराविरोधात २८ जानेवारी, तारकर्ली ग्रामस्थांनी तहसिलदार कार्यालयावर व स्कुबा डायव्हींग सेंटरवर निषेध मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व नगररचानकार, सिंधुदूर्ग यांचेद्वारा महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी (MCZMA) कडे रितसर प्रस्ताव दि. २१/१/२०१५ रोजी मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. त्यास पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी (MCZMA) यांनी त्यांच्या दि. ३१/१/२०१५ रोजी झालेल्या ९८ व्या बैठकीमध्ये तत्वत: मान्यता पारित केली आहे. त्यामुळे या इमारती अनधिकृत असल्याचा प्रश्न निकाली निघाला आहे.

(२) याबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार स्कुबा डायव्हिंग सेंटर नामफलकावर तारकर्लीच हवे या मागणीसाठी मूकमोर्चा/विशेष सभेचे आयोजन केल्याचे प्रसिध्द झालेले आहे. दि. २८/१/२०१५ रोजी तारकर्लीतील काही ग्रामस्थांचा समूह स्कूबा डायव्हिंग ट्रेनिंग सेंटरच्या प्रवेशद्वारावर आला होता. मात्र ग्रामस्थांपैकी कोणाही महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना भेटलेले नाही.

(३) याबाबत ग्रामस्थांची समजूत काढून शांततामय मार्गाने तोडगा काढणेबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी दि. १७/१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना विनंती केली आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण तालुका (जि.सिंधुदुर्ग) सर्जेकोट बंदराचा विकास करण्याबाबत

**(५) ७९९८ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सर्जेकोट बंदराचा विकास व्हावा अशी स्थानिक मच्छिमारांची गेल्या ३० वर्षापासून मागणी होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्जेकोट बंदराकरिता सुमारे ३३ कोटी रुपये खर्च करुन बांधलेल्या या अद्ययावत बंदराचे उद्घाटन यावर्षी मार्च महिन्यात करण्यात आले होते परंतु पूर्ण क्षमतेने अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, या बंदराचे कामावर एकूण रुपये १२.२३ कोटी खर्च झालेल्याच आहे. या कामाच उदघाटन २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी करण्यात आले असून या बंदराचा लाभ मच्छिमार घेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिधुंदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, देवगड व जामसंडे येथील नळपाणी पुरवठा योजनांच्या कामाबाबत**

**(६) ८००३ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिधुंदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग आणि देवगड या दोन प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीसाठी तब्बल ८१ लाख रूपये खर्च झाला असून त्याची पाणीपट्टीची वसुली सहा लाख रूपये झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपट्टी न भरल्यास पाणीपुरवठा बंद करावा लागेल असा इशारा जि.प.अध्यक्ष यांनी दिला आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच देवगड व जामसंडे (जि.सिंधुदूर्ग) येथील नळपाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित न ठेवण्याबाबत मा. पाणी पुरवठा मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा दरम्यान तेथील नागरिकांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग आणि देवगड या दोन प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१४-१५ अखेर रु. १६५.२८ लाख खर्च झाला असून त्याची पाणीपट्टीची वसुली रु.४३.४६ लाख रुपये झाली आहे.

(२) हे खरे नाही. मात्र जिल्हा परिषद अध्यक्षांनी पाणीपट्टी १००% वसुली होण्यासाठी सूचना दिलेल्या होत्या.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील टाळंबा, सरमळे, नरडवे धरण प्रकल्पाबाबत**

**(७) ८००८ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील टाळंबा, सरमळे, नरडवे धरण प्रकल्पांसह बालगंगा, कालू शाई आदि धरण प्रकल्पाचे काम करतांना वन आणि पर्यावरण कायद्यामधील तरतुदींचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाल्याचा ठपका कॅग ने ठेवला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायद्यातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या प्रकल्पांना नोटीसा बजावून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कणकवली जिल्ह्यात कोकण पॅकेज अंतर्गत राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातून**
**विंधन विहिरींवर दुहेरी हातपंप योजनांच्या मंजूरीबाबत**

**(८) ८०१० (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कणकवली जिल्ह्यात विंधन विहिरींच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी राज्य शासनाने कोकण पॅकेज अंतर्गत राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातून विंधन विहिरींवर दुहेरी हातपंप योजना मंजूर केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील अनेक योजना अर्धवट स्थितीत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदेर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना किती जिल्ह्यात मंजूर करण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, उक्त योजना अर्धवट राहण्यामागची कारणे काय आहेत व यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण (जि. सिंधुदुर्ग) शहरालगतच्या वायरी-देवबाग-तारकर्ली या**
**गावांना होणाऱ्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(९) ८०१३ (०७-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) शहरालगतच्या वायरी-देवबाग-तारकर्ली या गावांना माहे एप्रिल, मे दरम्यान तीव्र पाणी टंचाई जाणवत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उपरोक्त तिन्ही गावांसाठी धामापूर योजनेवरुन स्वतंत्र नळपाणी योजनेतून पाईपलाईन व तीन स्वतंत्र टाक्या बसविण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाली - भुतवली (ता.कर्जत, जि.रायगड) धरणाचे बांधकाम गेली १० वर्षे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(१०) ८०२८ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली - भुतवली (ता.कर्जत, जि.रायगड) धरणाचे बांधकाम गेली १० वर्षे अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणाचे बांधकाम अर्धवट स्थितीत असल्याने या भागातील शेतक-यांना शेतीला व पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेली १० वर्षे या धारणाचे बांधकाम अपूर्ण असल्याची कारणे कोणती,
(४) असल्यास, या धरणाचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे. धरणात ९० टक्के पाणी साठा निर्माण झाला आहे.
(२) नाही. धरणात ९० टक्के पाणीसाठा निर्माण करण्यात आल्याने पिण्याच्या पाण्याची अडचण नाही. मात्र योजनेच्या कालव्याची कामे, भूसंपादनाअभावी अपुर्णावस्थेत असल्याने संपूर्ण लाभक्षेत्रास पाणी देणे शक्य होत नाही.
(३) धरणाचे बहुतांशी काम झाले आहे. ५५४ हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कालव्याची कामे भू-संपादनानंतर रखडली आहेत.
(४) कालव्यासाठी भू-संपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. भू-संपादनानंतर कालव्याजी उर्वरित कामे पूर्ण करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील (ता.कर्जत) नेरळ शहरात वाहतुक कोंडीच्या समस्येने नागरीकांना त्रास सहन करावा लागत असल्याबाबत**

**(११) ८०३७ (०४-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील (ता.कर्जत) जागतिक पर्यटनस्थळाचा दर्जा लाभलेल्या माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या नेरळ शहरात वाहतुक कोंडीच्या समस्येने व अवजड माल वाहतुकीच्या, वाहनांच्या बेकायदा पार्किंगमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर पार्किंग हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१५) :** (१), (२) व (३) नेरळ शहरातील रस्ते अरुंद आहेत. तसेच, नेरळ बाजारपेठेत पार्किंगसाठी अधिकृत जागा नाही आणि टपऱ्या/दुकानांचे रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे. सदर दुकानदार आणि शासन यांच्यात उच्च न्यायालयात प्रकरण सुरु आहे.

शहरातील रस्त्यांवर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहचालकांवर योग्य ती कारवाई करण्यात येते. तसेच, बाजारपेठेत दुपारी १.०० ते ४.०० दरम्यान माल खाली करण्यास व्यापारी, शांतता समित, प्रतिष्ठित नागरिक आणि पोलीस यांच्यात बैठक घेऊन संमती देण्यात आली आहे. तसेच इतर वेळी माल खाली करण्यासाठी बाजारपेठेत वाहन उभे केले किंवा सदर वाहनामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण झाल्यास वाहनांवर वेळोवेळी कायदेशीर कारवाई केली जाते. त्यासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी यांची वाहतूक नियंत्रणासाठी नेमणूक केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) इंदिरा आवास योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(१२) ८०४२ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) इंदिरा आवास योजनेअंतर्गत उभारण्यात येणा-या घरकुलांची श्रेत्रीय अधिका-यांनी पाहणी न करता पडताळणी अहवाल देवून संबंधित ठेकेदारांना घरकुलाचे बील अदा केल्यामळे उर्वरित घरकुलांचे काम रखडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांने स्वत: करावयाचे आहे. तसेच घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान त्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये थेट जमा केले जाते. त्यामुळे ठेकेदारांना बील अदा करण्याचा तसेच याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कांदीवली (जि.मुंबई) येथ सरोजादेवी विद्यालय या शाळेतील शाळकरी मुलींच्या छेडछाडी प्रकरणी चौकशी करुन कारवाई करणेबाबत

**(१३) ८०८५ (०७-०४-२०१५). श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदीवली (जि.मुंबई) येथे सरोजादेवी विद्यालय या शाळेतील मुलींच्या छेडछाडीप्रकरणी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये चारकोप पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही या शाळा परिसरात मुलीची छेडछाड सुरु असतानाही स्थानिक पोलीस त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू छेडछाड करणा-यांवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय. श्रीमती सरोजादेवी आदर्श विद्यालय, चारकोप, कांदीवली या शाळेच्या मुख्याध्यापिकांकडून दिनांक २५११.२०१४ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. सदर अर्जामध्ये त्यांनी शाळा सुटण्याच्या व भरण्याच्य वेळेस बाहेरच्या मुलांकडून विद्यार्थी व विर्द्यार्थीनीना त्रास होत असल्याबाबत तक्रार केली होती. त्यानुसार चारकोप पोलीस ठाणेमार्फत शाळेच्या परिसरात शाळा भरताना व सुटताना साध्या वेशातील छेडछाड विरोधी पथक, ए.टी.सी. तसेच गस्ती वाहनांद्वारे गस्त घालण्यात येत आहे. त्यामुळे अद्यापपर्यंत सदर शाळेतील विद्यार्थ्यांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) वाशिद जवळील खातीवली वेहळोली येथील पाझर तलावामध्ये पोलिस कर्मचा-यांच्या बुडून मृत्यू प्रकरणी चौकशी करणेबाबत**

**(१४) ८०८८ (०७-०४-२०१५). श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे), वाशिंद जवळील खातीवली वेहळोली येथील पाझर तलावामध्ये दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी पोलिस कॉन्स्टेबल हरड यांचा बुडून मृत्यू झाला,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकणी हरड यांच्या कुटुंबियांनी घातपाताचा संशय व्यक्त करुन चौकशी करणेबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात आढळून आले आहे, चौकशी नुसार कोणती कारवाई करण्या आली वा येत आहे,

(४) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दि. २२.१.२०१५ रोजी श्री.हरड, पोलीस हवालदार खातीवली गावाच्या हद्दीतील पाझर तालवात पोहण्यासाठी पाण्यात उतरले असता, पोहताना त्यांचा दम तुटल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला आहे. सदर प्रकरणी घटना प्रत्यक्ष पाहणारे साक्षीदार यांच्याकडे चौकशी केली असून, या प्रकरणी कोणताही संशयाचा प्रकार निष्पन्न झालेला नाही. जे.जे.हॉस्पीटल, मुंबई येथे शवविच्छेदन करण्यात आले असून, अहवालामध्ये श्री.हरड, पोलीस हवालदार पाण्यात बुडाल्याने मरण पावल्याचे नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिक्षण हक्क कायद्यानुसार राखिव असलेल्या २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेत सुसुत्रता आणण्याबाबत**

**(१५) ८१११ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार राखिव असलेल्या २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी शासनाने निकष तयार केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकषाचे स्वरुप काय आहे व अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) शिक्षण हक्क कायद्यानुसार २५% आरक्षणांतर्गत प्रवेश देण्यासाठी शासनाने दिनांक २४/५/२०१२, दिनांक १५/३/२०१३ व दिनांक १५/५/२०१४ च्या आदेशानुसार पुढीलप्रमाणे आहेत.

- वंचित व दुर्बल घटकातील बालकांसाठी २५% प्रवेशिका बालकांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत-कोणतीही जमीन, इमारत,साधसामग्री किंवा इतर सुविधा एकतर मोफत किंवा सवलतीच्या दरात दिल्यामुळे अशा शाळेसाठी, विनिर्दिष्ट संख्येतील बालकांना मोफत शिक्षण पुरविणे आधीपासूच बंधनकारक आहे तेथे, अशी शाळा अशा आबधनाच्या मर्यादेपर्यंत मिळण्यासाठी हक्कदार असणार नाही अशी तरतूद
- वंचित व दुर्बल घटकातील बालकांसाठी २५% प्रवेशित बालकांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव प्रवेशांच्या निकषातून विनाअनुदानित अल्पसंख्यांक संस्था,मदरसा,वेदिक पाठशाळा व प्रामुख्याने धार्मिक निदेशन देणाऱ्या संस्थांना वगळण्यात आले आहे.
- वंचित व दुर्बल घटकांतील बालकांसाठी २५% राखीव जागांवर प्रवेश देण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्याबाबत.

सदर निकषांनुसार प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी शिक्षण संचालकांमार्फत करण्यात आली आहे.

- सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाकरीता आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांसाठी ६८८४ प्रवेश देण्यात आले.
- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात २५ टक्के राखीव जागांवर २७७५३ प्रवेश देण्यात आले आहेत.
- सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात आरटीई अंतर्गतच्या २५% राखीव जागांवर ऑनलाईन व ऑफलाईनद्ववारे एकूण ४७२१६ प्रवेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या**
**कामांकडे मंजुरांची कमतरता असल्याबाबत**

**(१६) ८१५८ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगारीची १०० टक्के हमी असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांकडे मंजुरांनी पाठ फिरविल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात ११६० कामे सुरु असून अद्याप ४३१० कामे मजुरांअभावी सुरु करण्यात आलेली नाही, उक्त योजनेअंतर्गत मजुरांना काम मिळत असले तरी प्रत्यक्षात मजुरी अत्यल्प मिळते योजनेवर काम करणा-यांना मजुरांना केवळ १६८ रुपये देण्यात येतात परंतु याच मजुरांना खासगी क्षेत्रात दरदिवशी २५० ते ३०० रुपये मजुरी मिळत आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेमध्ये रोजगार सुविधा वाढविण्याबाबत शासन विचार करणार वा करीत आहे काय,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्हयात सन २०१४-१५ मध्ये एकूण २९४७ इतकी कामे सुरु करण्यात आली असून एकूण १७७१५२ इतकी मनुष्यदिन निर्मिती झालेली आहे.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये मजुरी दर रु.१६८/- इतका निश्चित करण्यात आला होता. त्यामध्ये वाढ होवून दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून रु.१८१/- इतका लागु करण्यात आला आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिका येथील काटेपूर्णा प्रकल्पापासून ते शहरातील पाणी वितरण व्यवस्थेचे वॉटर ऑडीटच झाले नसल्याबाबत

**(१७) ८१९२ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिका अस्तित्वात येऊन तब्बल १४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असूनही अद्यापपर्यंत काटेपूर्णा प्रकल्पापासून ते शहरातील पाणी वितरण व्यवस्थेचे वॉटर ऑडीटच झाले नसल्याची धक्कादायक माहिती जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त वॉटर ऑडीट न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू ऑडीट होण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :** (१) होय.
(२) अकोला पाणी पुरवठा योजना दिनांक ०१.०९.२००६ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून देखभाल व दुरुस्तीकरिता अकोला महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. परंतु तांत्रिक वर्ग तसेच आर्थिक परिस्थिती योग्य नसल्यामुळे सुधारात्मक कामे व वॉटर ऑडीट व एनर्जी ऑडीट ची कामे प्रलंबीत आहेत.

सुजल निर्मल अभियानाची मुदत संपल्यामुळे त्यातील सर्व प्रस्ताव (अकोला पाणी पुरवठा योजने अंतर्गत सुधारात्मक कामे वॉटर ऑडीट, एनर्जी ऑडीट व इतर कामे) सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानातंर्गत मंजूरीकरीता सादर करण्यात आली आहे.
(३) उपरोक्त प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

**अकोला महानगरपालिका उपायुक्त यांनी अवैध पध्दतीने बांधकाम, दुकाने घरे पाडल्याबाबत**

**(१८) ८१९७ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका उपायुक्त श्री.दयानंद चिंचोलीकर यांनी अवैध पध्दतीने बांधकाम, दुकाने घरे पाडल्याबाबत त्यांच्यावर नुकसान भरपाई घेऊन फौजदारी कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

**अकोट-अकोला रोड (जि.अकोला) या राज्य मार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(१९) ८२०४ (०९-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट-अकोला रोड (जि.अकोला) या राज्य मार्गावर दैनंदिन हजारो वाहनांची वर्दळ असते परंतु येथील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रोडवरील कुटासा फाटा ते शासकीय आश्रमशाळेपर्यंत रस्ता खराब असतानाही त्याची दुरुस्ती करण्याऐवजी दोन्ही बाजूला गतीरोधक टाकून वाहनांना अडथळा निर्माण करण्यात आला असून वाहने हळू चालवा असे सूचना फलक लावले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त रस्ता दुरुस्ती प्रकरणी दुर्लक्ष करणा-या अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) कुटासा फाटा ते आश्रम शाळेपर्यंतचा रस्त्याचा काही पृष्ठभाग पावसाळ्यात काही प्रमाणात दबलेल्या अवस्थेत असल्याने दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने सूचना फलक लावले आहेत. रस्ता दुरुस्तीपूर्वी व दुरुस्ती दरम्यान वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी ताप्तूरत्या स्वरुपात गतीरोधक टाकण्यात आले होते. सद्य:स्थितीत रस्ता दुरुस्त करण्यात आला असून, गतीरोधक काढून टाकण्यात आले आहेत,
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या**
**जिल्हास्तरीय दक्षता पथकाबाबत**

**(२०) ८२०८ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोजगार हमी योजनेच्या कामांत अपहार किंवा भ्रष्टाचार होत असल्यास त्याचा शोध घेऊन संबंधितांवर कारवाईची जबाबदारी असलेले जिल्हास्तरीय दक्षता पथकाने अकोला जिल्ह्यातील एकाही कामासंदर्भात कोणावरील कारवाई न केल्याचे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दक्षता समितीने अद्‌याप पर्यंत एकही कामासंदर्भात कारवाई न करण्याची कारणे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व या समितीने तातडीने कामासंदर्भात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :** (१) तक्रार अर्जावर १६/२०१५ रोजी चौकशी केली आहे. पोलीस निरीक्षक बोरगांव मंजूर यांचे म्हणण्यानूसार अपहाराची रक्कम नमूद करुन सादर करण्याचे कळविले असल्यामुळे FIR दाखल झाला नाही. परंतु सचिव, सरपंच, मा.आमदार श्री.सिरस्कार यांचे पत्रारनुसार त्यांचे म्हणने ऐकून घेऊन प्रकरण उपविभागीय अधिकारी अकोट यांना चौकशी करीता देण्यात आले आहे.
(२) १६/१/२०१५ पासुन २१/३/२०१५ पर्यत चौकशी अहवाल सादर केला नाही. म्हणून शिस्तभंगाची नोटीस देण्यात आली आहे.
(३) उपविभागीय अधिकारी अकोट यांचे स्तरावर चौशी सुरु आहे.
(४) उपविभागीय अधिकारी अकोट यांचा चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल.

---

**अकोला जिल्हा परिषद प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे भरती प्रक्रिया रखडली असल्याबाबत**

**(२१) ८२०९ (०७-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या १५ महिन्यांपासून ग्रामपंचायत जिल्हा सेवा ज्येष्ठता यादीनुसार १० टक्के वर्ग तीन व वर्ग चारच्या पदाकरीता ग्रामपंचायत कर्मचा-यांना आरक्षण देण्याचे शासनाचा आदेश असूनही सदर भरती प्रक्रिया अकोला जिल्हा परिषद प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सेवाज्येष्ठता यादीनुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांना आरक्षण न देणा-या व भरती प्रक्रिया न राबविणा-या अधिका-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :** (१) व (२) ग्रा.वि.व. ज.सं.वि. शासन अधिसुचना, १९/०८/२००५ अन्वये सरळसेवेच्या रिक्त पदापैकी १० टक्के पदे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यामधुन भरणेबाबत अति मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. जिल्हा परिषद मध्ये वर्ग-३ वर्ग-४ मध्ये सामावून घेण्याकरिता १९ कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली असून दिनांक ०४/०३/२०१५ अन्वये नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहे. त्यापैकी १३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

६ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी ग्रामसेवक या पदावर निवडीबाबत आक्षेप प्राप्त झाले असल्याने आक्षेपाची पडताळणीची कार्यवाही सुरु असून आक्षेपाची पडताळणी पूर्ण करुन नियुक्ती संदर्भात निर्णय घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण येथे कत्तलीसाठी गुरे घेऊन जाणा-या इसमांना पोलिसात दिल्याने युवकास समाजकंटकाकडून जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत**

**(२२) ८२१७ (०६-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण परिसरात अनधिकृतपणे कत्तलीसाठी गुरे घेऊन जाणा-या इसमांना अडवून वाहनासह सदर इसमांना पोलिसात दिल्याने कल्याण येथील पराग तेली (परदेशी) या युवकास कल्याण येथील काही समाजकंटकाकडून जीवे मारण्याची धमकी दिली गेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी बाजारपेठ पोलिसात श्री.पराग तेली यांनी संबंधित समाजकंटकांविरूध्द पोलीस तक्रार देऊन आपल्या कुटूंबियांच्या जीवितास धोका असल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) सदर प्रकरणी पगार तेली यांनी बाजारपेठ पोलीस ठाणे तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना तक्रारी अर्ज दिलेला होता.
(३) पराग तेली यांनी पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दिला होता व त्यात त्यांनी माझे व माझे कुटुंबियस समाज कंटकापासून जिवीतास धोका व मला स्वसंरक्षणासाठी पिस्टल शस्त्राचा परवना मिळावा म्हणून अर्ज केला होता. अर्जदार यांना पोलीस ठाण्यात पोलीसासमक्ष कोणीही शिवीगाळ अथवा धमकी दिलेली नसून त्याबाबतची कोणतीही चित्रफित पोलीस ठाण्यात नाही. अर्जदार यांनी यापुर्वीही शस्त्र परवाना मिळणेकामी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडे अर्ज सादर केला होता. परंतु त्यांच्यावर गुन्हे दाखल असल्याने त्यांना शस्त्र परवाना नाकारण्यात आला होता. अर्जदार यांनी त्यांचे तक्रारी अर्जात दिलेला प्रकार घडलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीत ज्युपीटर हॉस्पीटल येथे**
**पादचारी भूयारी मार्ग निर्माण करण्याबाबत**

**(२३) ८२२६ (०७-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ज्युपीटर हॉस्पीटल व विविआना मॉलच्या मध्यवर्ती ठिकाणाहून हायवेवर पादचारी पुल किंवा हायवेवर भूयारी मार्ग उभारण्याबाबत नागरिकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) उपरोक्त ठिकाणी उड्डाणपुलाजवळील महामार्ग ओलांडताना अनेक अपघात होऊन नागरिकांना आपले जीव मुठीत धरून रस्ता ओलाडावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यातील अपघात टाळण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) ठाणे महानगरपालिका हद्दीतील ज्युपीटर हॉस्पीटल व विविआना मॉलच्या मध्यवर्ती उभारणीसाठी हायवेवर पादचारी पुल उभारणीसाठी कंत्राटदार मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.यांना कामाचा कार्यादेश दिनांक १२.११.२०१३ रोजी देण्यात आला. सद्य:स्थितीत सुमारे ३५ टक्के काम पूर्ण झाले असून डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हाफकीन महामंडळ सनदी अधिकारी आणि व्यवस्थापक यांच्या गैरव्यवहारामुळे तोटयात असल्याबाबत**

**(२४) ८२३५ (०७-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन पुरस्कृत हाफकीन महामंडळ सनदी अधिकारी आणि व्यवस्थापक यांच्या गैरव्यवहारामुळे तोटयात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेथे नियुक्त केलेले व्यवस्थापकीय (संचालय, व महाव्यवस्थापक) यांच्या बेजबाबदार कार्यशैलीमुळे शासनाची ही संस्था मोडकळीस आली असून तेथे काम करणा-या महिला कर्मचा-यांची मानसिक त्रास होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) याबाबत शासनाने वरिष्ठ पातळीवरून चौकशी समिती नेमण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. गिरीश बापट (१६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. गेले ३ वर्ष महामंडळ नफ्यात आहे.

(२) नाही, तसेच संस्था मोडकळीस आली नसून उलाढाल वाढली असून नफ्यात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील यंत्रणेवर ताण पडत असल्याबाबत**

**(२५) ८२४० (०४-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे २५ लाखांहून अधिक दुचाक्या, सहा लाख मोटारी, दोन लाख अवजड वाहने आणि लाखभर रिक्षांचा पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील यंत्रणेवर गेल्या तीन चार वर्षात ताण येत आहे, हे खरे आहे काय,

(२) त्याचा फायदा घेत संगमपूल आणि आळंदी रस्त्यावरील कार्यालयात सुमारे पाचशे बड्या एजंटांनी आपली दुकाने थाटली असून या एजंटांना अधिकाऱ्यांचा वरदहस्त आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात मार्च, २०१५ अखेरपर्यंत सुमारे २१ लाख दुचाकी, ५ लाख चारचाकी, ४५ हजार रिक्षा व ५८ हजार अवजड वाहनांची नोंदणी झाली आहे.

(२) हे खरे नाही.
संगम ब्रिज व आळंदी रोड चाचणी मैदान कार्याय या दोन्हीही परिवहन कार्यालयांच्या आवारात एकाही एजंटने दुकाने थाटलेले नाही.
(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयावरील ताण कमी करण्यासाठी पुणे शहर व परिसरात नवीन कार्यालये सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील "सावित्रीबाई फुले" विद्यापीठात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या अपुरी असल्याबाबत**

**(२६) ८२५० (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील "सावित्रीबाई फुले "विद्यापीठाचा विस्तार पाहता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या अपुरी असून ४०० एकरांच्या परिसरासाठी केवळ दिडशे सुरक्षा रक्षक आहेत, त्यातील केवळ ३० जणच कायम सेवेत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विद्यापीठाच्या सुरक्षा सेवकांना सुरक्षाविषयक कोणतेही प्रशिक्षण दिलेले नसून त्यांच्याकडे कोणतीही शस्त्रास्त्रे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या ४३७ इतकी असून विद्यापीठाच्या एकूण ४११ एकर परिसराकरीता २७ सुरक्षा रक्षक कर्मचारी कार्यरत आहेत.
(२) सदर कर्मचाऱ्यांना नागरी सुरक्षा दलाकडून आपत्ती व्यवस्थापनाबाबत तसेच, एन.डी.आर.एफ. तळेगाव या केंद्र शासनाच्या संस्थेकडून प्रशिक्षण घेण्यात आलेले आहे. सदर कर्मचाऱ्यांकडे शस्त्रास्त्रे नसली तरी विद्यापीठाच्या आवारात १ पोलीस स्टेशन व १ पोलीस चौकी कार्यरत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर आणि ग्रामीण भागात पोलिसांची मनुष्यबळाची कमतरता सर्वाधिक असल्याबाबत**

**(२७) ८२५५ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर आणि ग्रामीण भागात पोलिस मनुष्यबळाची कमतरता सर्वाधिक असल्याची बाब डिसेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय निकषांनुसार दर एक लाख लोकसंख्येमागे सुमारे ४०० पोलीस असणे आवश्यक असताना पुणे जिल्हात हे प्रमाण सर्वात कमी असून, एक लाख लोकसंख्येसाठी केवळ ६४ पोलिस उपलब्ध आहेत, त्याचा थेट परिणाम पोलीसांच्या कामकाजावर होत असून, गुन्हेगारी वाढण्यामागे हे एक मुख्य कारण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) व (२) होय.

सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे ग्रामीण जिल्हयाची एकूण लोकसंख्या ४६,५१,०३७ इतकी आहे. या घटकाचे मंजूर मनुष्यबळ/संख्याबळ हे ३८०० इतकेच आहे. त्याप्रमाणे सध्या १,२२४ लोकसंख्येमागे १ पोलीस कर्मचारी असे मनुष्यबळ उपलब्ध आहे.

(३) दि.४.३.२०१४ च्या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्त, पुणे व पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण याच्या आस्थापनेवर नीवन १२ पोलीस स्टेशन निर्माण करण्यात आली असून त्यासाठी विविध संवर्गात २०४२ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी विठ्ठलवाडी ते वारजे हया रस्त्याबाबत**

**(२८) ८२६३ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी विठ्ठलवाडी ते वारजे हया रस्त्याच्या मागणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जानेवारी, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार सदर रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) विठ्ठलवाडी ते वारजे या नदीकाठच्या रस्त्याचे ब्ल्यू लाईन मध्ये येणारे बांधकाम काढून टाकणेबाबतचा अंतिम निर्णय मे. राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक १४.०१.२०१५ रोजी दिला आहे. मे.राष्ट्रीय हरित लवादाचे निर्णयाविरुध्द पुणे महानगरपालिकेतर्फे मे.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले होते. सदरचे अपील दिनांक १२.२.२०१५ रोजी मे. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले असून मे. राष्ट्रीय हरित लवादाचा निर्णय कायम केला आहे व रस्त्याचे ब्ल्यु लाईन मध्ये येणारे काम ६ महिन्यात काढून टाकण्यास मुदत देण्यात आली. त्यानंतर दिनांक २७.३.३०१५ व दिनांक २९.४.२०१५ रोजी प्रत्यक्ष कारवाईस सुरुवात करता आलेली नाही. पुणे महानगरपालिकेने पुणे पोलिसांना बंदोबस्तातील कारवाईसाठी पत्र व्यवहार केला असून, त्यानुसार महानगरपालिकेतर्फे पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

---

**इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) रत्नापूरी येथील शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या तीन हजार एकर जमिनीत सुबाभळ उगविली असून जमीन नापीक झाल्याबाबत**

**(२९) ८२९४ (०७-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) रत्नापूरी येथील शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या तीन हजार एकर जमिनीत सुबाभळ उगविली असून जमीन नापीक झाली आहे काय,

(२) असल्यास सदर जमिनीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर जमिन लागवडीखाली आणणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :** (१) शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यात सध्या पीक योजना राबवित नसल्याने सदर जमिनीत काही ठिकाणी वेडी बाभूळची झाडे उगविली आहे. परंतु त्यामुळे जमीन नापीक झाली नाही.

(२) व (३) खंडकऱ्यांना जमिनीचे वाटप करुन सदर मळ्यामधील महामंडळाकडे शिल्लक राहिलेल्या जमीनीवर संयुक्त शेती पध्दतीने शेती करण्याचे महामंडळाचे प्रयत्न चालू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पहिली ते आठवी पर्यंतची परिक्षा पुन्हा सुरु करण्याबाबत

**(३०) ८२९९ (०९-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिली ते आठवी पर्यंतची परीक्षा पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठवीनंतर अनेक स्पर्धा परिक्षांना तोंड देण्याची मानसिक तयारी होण्यासाठी परीक्षा आवश्यक असल्याने पहिली ते आठवी पर्यंतची परिक्षा सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे आयुक्तालयाच्या क्षेत्रात महिलांच्या अत्याचारांच्या घटनेत दुप्पटीने वाढ झाल्याबाबत

**(३१) ८३१० (०६-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आयुक्तालयाच्या क्षेत्रात महिलांच्या अत्याचारांच्या घटनेत दुप्पटीने वाढ झाल्याचे नॅशनल क्राईम ब्युरोने माहे जुलै २०१४ मध्ये प्रसिध्द केलेल्या गुन्हयाच्या आकडेवारीमध्ये नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्याचार रोखण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) व (२) ठाणे आयुक्तालयातील परिक्षेत्रात महिलांच्या अत्याचारात गत काही वर्षात थोडीशी वाढ झालेली आहे. सन २०१२, २०१३ व २०१४ मध्ये महिलांच्या अत्याचरांचे दाखल केलेले गुन्हे, उघड झालेले गुन्हे व अटक आरोपी यांचे माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|---|
| १. | २०१२ | ६३६ | ६१७ | १२९४ |
| २. | २०१३ | १०२५ | ९६३ | १७०९ |
| ३. | २०१४ | १०७९ | ८५९ | १४३० |

ठाणे आयुक्तालयातील परिक्षेत्रातील परिमंडळ व पोलीस ठाणे पातळीवर महिला अत्याचार रोखण्याकरीता वेळोवेळी शांतात मोहल्ला कमिटी महिला दक्षता समितीच्या बैठका घेण्यात येऊन त्या माध्यमातून महिला अत्याचार रोखण्याकरीता जनतेमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच शाळा व कॉलेजमध्ये बैठका घेऊन तेथील शिक्षक वर्ग व विद्यार्थी यांना सदर गुन्ह्याबाबतचे गांभीर्य लक्षात आणून देऊन अश प्रकारचे गुन्हे घडू नयेत याबाबत सतर्क राहण्याच्या सुचना व मार्गदर्शन करण्यात येते. महिला अत्याचार रोखण्याकरीता जनतेमध्ये जनजागृती होण्याकरीता व महिलांना कोणत्याही अमिषाला बळी पडू नये याकरीता सुचना व मार्गदर्शनाबाबतचे जाहीरात फलक मोक्याच्या ठिकाणी लावण्यात आलेली आहे. परिमंडळ स्तरावर महिला छेडछाड पथक स्थापन करण्यात आले आहे. मोक्याचे व गर्दीचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आले आहेत. पोलीस स्टेशन स्तरावर महिला तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कक्षात महिला अत्याचाराच्या तक्रारी प्राप्त होताच कार्यवाही करण्याच्या सुचना पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पर्यटकांच्या समस्या दूर करण्याबाबत**

**(३२) ८३२२ (०६-०४-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर राज्यांच्या तुलनेने परदेशी पर्यटकांची संख्या नेहमीच अधिक असते परंतु परदेशी पर्यटकांना प्रवास करीत असताना वा पर्यटन स्थळी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच परदेशी पर्यटकांना किरकोळ विक्रेते, भिक्षेकरी त्याचप्रमाणे ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक यांच्याकडून मोठया प्रमाणात उपद्रव होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पर्यटकांच्या समस्या दूर करुन सोयीसुविधा देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

(३) देशी-विदेशी पर्यटकांना पर्यटन स्थळी जाण्याकरीता इंग्रजी व मराठी भाषेतील दिशादर्शक व माहिती फलक व स्टेक होल्डर यांच्यात जागृती करण्याकरीता क्लिन इंडिया, पर्यटन क्लब या प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच केंद्र व राज्य सरकार यांचेमार्फत हून से रोजगार व कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत वाहन चालक प्रशिक्षण व हाउस किपिंग, फुड प्रॉडक्शन, बेकरी ॲन्ड पेस्ट्री इ.प्रशिक्षण देऊन पर्यटकांच्या समस्या दूर करण्याच्या उपाय योजना करण्यात येत आहेत. पर्यटकांच्या निवासाची समस्या दूर करण्याच्या उद्देशाने निवासन्याहरी व महाभ्रमण योजना महामंडळामार्फत सुरु करण्यात आली असून अनुक्रमे १३२४ व ५४ एवढे योजनाधारक आहेत. तसेच सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या पोलीस विभागाने समुद्र किनारी असलेल्या पर्यटनस्थळी पोलीस चौक्या व पोलीस मदत केंद्रे उभारली आहेत. तसेच, केंद्र शासनाच्या कोस्टगार्ड विभागामार्फत सागरी सुरक्षिततेसाठी कोस्टगार्ड ठाणे उभारले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयात एका महिलेला गावाने वाळीत टाकल्याने त्या महिलेने आत्महत्या केल्याबाबत

**(३३) ८३३३ (०६-०४-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात एका महिलेला गावाने वाळीत टाकल्याने त्या महिलेने आत्महत्या केली, तसेच पोलादपूर येथील भोगाव येथील राहुल येलंगे आणि त्यांच्या पत्नीस गावक-यांनी वाळीत टाकल्याची तक्रार पोलादपूर तालुका वाळीत प्रकरण समन्वय समितीच्या बैठकीत करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर कुटुंबाला मानसिक छळ होत असून याप्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, रायगड; उप विभागीय पोलीस अधिकारी, महाड व इतर अधिकारी यांच्या येलंगेवाडी येथील ग्रामस्थांसोबत झालेल्या बैठकीत तेथील ग्रामस्थांनी सहकार्याची भूमिका घेतल्याने प्रकरण तडजोडीतून मिटल्याचे जाहीर करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेत कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(३४) ८३४२ (६-०४-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेत कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प बंद आहेत, मुंबई शहरामध्ये निर्माण होणारा कचरा मोठ्या प्रमाणात खाडी व समुद्रात टाकला जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे,
(३) असल्यास, खाडी व समुद्रात कचरा टाकणाऱ्या संबंधितांवर व कंत्राटदारावर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. महानगरपालिकेने कच-यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प पीपीपी (पब्लीक प्रायवेट पार्टनरशिप) तत्वावर देवनार, मुलुंड व कांजूर क्षेपणभूमी येथे हाती घेतले आहेत. मुंबईतील कचरा मोठ्या प्रमाणात खाडी व समुद्रात टाकला जात असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भांडुप येथील भांडुपेश्वर कुंडास क वर्ग पर्यटनाचा दर्जा देण्याबाबत**
**(३५) ८३५० (०७-०४-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप पूर्व येथील भांडुपेश्वर कुंड हे अति प्राचिन असून त्यास क वर्ग पर्यटनाचा दर्जा देण्याबाबतचा ठराव जिल्हा नियोजन समितीमध्ये मंजूर झालेला असून तसा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१) नाही, दि.३१.१०.२०१३ च्या जिल्हा नियोतन समितीच्या बैठकीत भांडुप येथील भांडुपेश्चवर कुंड या स्थळास "क" वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या अनेक सायन्स विभागांना स्वत:ची जागा आणि अद्यावत तंत्रज्ञानयुक्त प्रयोगशाळा नसल्याबाबत**

**(३६) ८३५५ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या अनेक सायन्स विभागांना स्वत:ची जागा व अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त प्रयोगशाळा नसल्यामुळे तसेच उक्त विद्यापीठातील १२० प्राध्यापकांच्या जागा रिक्त असून ५ मुख्य विभागांचे प्रमुख नसल्याने व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे अवघड झाल्यामुळे गेल्या काही वर्षापासून बाहेरच्या कंपन्या विद्यापीठात प्रोजेक्ट घेवून येणे बंद झाले आहे, परिणामी विद्यार्थ्यांना मिळणारी स्कॉलरशिप, मानधन बंद झाले आहे, विद्यार्थ्यांना मोठ्या मेहनतीने तयार केलेले सॅम्पच्या रिझल्टसाठी खाजगी किंवा पुणे विद्यापीठाकडे परीक्षणासाठी जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या गैरसोयी दूर करण्यासह विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०७-२०१५) :** (१) व (२) होय, एकूण ३६५ अध्यापकांच्या पदांपैकी २०९ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु आहे. दिनांक १० डिसेंबर, २०१३ व इतर जाहिरातीद्वारे दिलेल्या पदांची भरती प्रक्रिया सुरु असून छाननी पूर्ण झालेली आहे व मुलाखतीची प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वास्तव्यास असणा-या वडार समाजाला जातीच्या दाखला मिळण्यास अनेक जाचक अटीचा सामना करावा लागत असल्याबाबत**

**(३७) ८३७३ (०९-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वास्तव्यास असणा-या वडार समाजाला जातीच्या दाखला मिळण्यास अनेक

जाचक अटीचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, व चौकशीत काय आढळून आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयाच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे. केवळ त्याच जातीतील समाजाच्या लोकांना मागासवर्गीयाचे जातप्रमाणपत्र देण्यात येते. सदर यादीतील विमुक्त जाती. अ या प्रवर्गात अ.क्र. १२ वर ''वडार'' या जाती समाजाचा समावेश आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे सादर केल्यास त्यांना जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडच उद्‌भवत नाही. सदर नियमांनुसार विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, २१/११/१९६१ रोजी वा तत्पर्वी त्यांच्या राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्ती हया उदरनिर्वाहाकरिता भटकंती करत असल्याने त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सोयीचे व्हावे याकरिता ते ज्या ठिकाणी वास्तव्य करीत असतील त्या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने दिलेले प्रमाणपत्र एक पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबतच्या सूचना दि. १/१०/२००८ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई प्लास्टिकविरोधी कारवाई मंदावली असल्याबाबत

**(३८) ८३७८ (०६-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई प्लास्टिकविरोधी कारवाई मंदावली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्ण शहरासाठी केवळ दोनच पथके आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईची लोकसंख्या व व्यवसाय यांची मोठी व्याप्ती असताना केवळ दोन पथकांमार्फत कारवाई होऊ शकत नसल्याने यामध्ये वाढ करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या व ८X१२ इंचापेक्षा कमी आकाराच्या प्लास्टिक पिशव्यांवर प्रभावीपणे कारवाई करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनातील कंत्राटी बांधकाम मजुरांच्या सोयी-सुविधांबाबत

**(३९) ८३८८ (१०-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून कंत्राटी बांधकाम मजुरांच्या सोयी-सुविधांकरिता कर आकारला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत शासनाकडे किती कर जमा झालेला आहे व सदर करातून कंत्राटी बांधकाम मजूरांच्या कल्याणासाठी शासनाने कोणत्या योजना राबविल्या आहेत,

(३) तसेच कंत्राटी बांधकाम मजूरांच्या कल्याणासाठी योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२०-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे .

(२) आजतागायत उपकर वसुलीच्या माध्यमातून शासनाकडे सुमारे रु. २८९४ कोटी एवढी रक्कम झालेली आहे. सदर रकमेतून बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी शासनाकडून विविध १७ कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

सदर योजनेंतर्गत मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना लाभ देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगाव ते बोरिवली हा नवा फ्री वे बांधण्याबाबत

**(४०) ८३८९ (१०-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पूर्व उपनगरातील फ्री वे च्या धर्तीवर पश्चिम उपनगरातील लिंकरोड लगत गोरेगाव ते बोरिवली हा नवा फ्री वे बांधण्यत येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा फ्री वे बांधण्यास शासनाची मंजूरी मिळाली आहे काय, तसेच सदर उड्डाणपुल बांधण्यासाठी शासनास किती खर्च येणार आहे,

(३) असल्यास, सदर फ्री वे बांधण्याबाबतचा आराखडा काय आहे व सदरहू बांधकामास किती कालावधी लागणार आहे, तसेच सदरहू फ्री वे च्या बांधकामास प्रत्यक्षात कधीपर्यंत सुरुवात होणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महामार्ग सुरक्षा पोलिसांकडे मनुष्यबळ कमी असल्याबाबत

**(४१) ८३९६ (०७-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्ग सुरक्षा पोलिसांकडे २२०० ऐवजी अवघे एक हजार कर्मचा-यांचे मनुष्यबळ असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, महामार्ग पोलिसांकडे भरधाव वाहनांना रोखण्यासाठी वेगवान वाहनेही नसल्याचे व गतिरोधकांची पूर्व सूचना देणारे धोक्याचे फलक, खबरदारीचे उपाय फलक इत्यादी महामार्गावर नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) महामार्ग पोलीस विभागाकडे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची एकूण २,३४८ पदे मंजूर असून सद्यस्थितीत १,३३० पदे कार्यरत आहेत.
(२) महामार्गावरील गस्तीकरीता व वाहतूक नियमनाकरीता महार्गा पोलीस विभागाकडे ८१ चारचाकी वाहने आणि १५२ मोटार सायकल उपलब्ध आहे. अति वेगाने जाणाऱ्या वाहनांना रोखण्यासाठी महामार्ग पोलीसांकडे उच्च क्षमतेची वाहने उपलब्ध नाहीत.

महामार्गावर गतिरोधकांची पूर्वसूचना देणारे तसेच इतर खबरदारीच्या सूचना देणारे फलक बहुतांश ठिकाणी लावण्यात आलेले आहेत.
(३) महामार्ग पोलीस विभागाकडील पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महामार्गावर एखाद्या ठिकाणी सूचना फलकांची आवश्यकता आढळून आल्यास देखभाल करणाऱ्या संबंधित यंत्रणेशी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात येता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील रोडवरील अनधिकृत ऑटोरिक्षांच्या थैमानांची स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्याबाबत

**(४२) ८४१४ (०४-०१-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील व्ही पी रोडवरील अनधिकृत ऑटोरिक्षांच्या थैमानांची स्थानिक नागरिकांनी केलेल्या अनेक तक्रारी गेल्या अडीच वर्षापासून अंधेरी आरटीओ व डी एन नगर वाहतूक विभागास प्राप्त झालेल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी डी.एन. नगर वाहतूक विभाग व अंधेरी आर.टी.ओ. कडून संयुक्त कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, सदर परिसर अनधिकृत ऑटोरिक्षांपासून मुक्त करण्यास कारवाई न करणाऱ्या डी.एन.नगर वाहतूक विभाग व अंधेरी आर.टी.ओ.च्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने व्ही.पी.रोड/जे.पी.रोड येथे डी.एन.नगर वाहतूक पोलिसांसमवेत माहे नोव्हेंबर, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत ऑटो-रिक्षांविरुध्द विशेष तपासणी मोहिम राबविली या मोहिमेदरम्यान तपासण्यात आलेलया एकूण ६०७ वाहनांपैकी दोषी आढळलेल्या १७६ वाहनांवर आवश्यकतेनुसार जप्ती/दंड वसूलीची कारवाइ करण्यात आली.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी येथील नेहरु नगर व जुहू परिसरामध्ये अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(४३) ८४१५ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी येथील नेहरु नगर व जुहू परिसरामध्ये गुंडगिरी, अंमली पदार्थाची विक्री, वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात गुंडगिरी व अन्य अनधिकृत कामे करणा-यांची नावे स्थानिक पोलीस ठाण्याला प्राप्त झाली आहेत. स्थानिक पोलीसांनी त्यांना अटक केली आहे काय,
(३) नसल्यास, सदर प्रकरणी कोणतीही कारवाई न करणा-या पोलीस अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :** (१) जुहू पोलीस ठाणे माहे जानेवारी, २०१५ मध्ये अंमली पदार्थ सेवन करणाऱ्याविरुध्द ९ गुन्हे नोंद करुन १० इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे. अंमली पदार्थ विकी करणाऱ्याविरुध्द १ गुन्हा नोंद करुन १ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच वेश्या व्यवसाय करणाऱ्या एकूण स्त्रियांवर कलम ११० मुं.पो.का.अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(२) प्रकरणी २ आरोपी जेल कस्टडीत आहेत. २ आरोपीना हद्दपार करण्यात आलेले आहे. ४ आरोपीकडून बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहेत. एक आरोपी दोषसिध्द होऊन कारावासात असून एका आरोपीचा हद्दपारीचा प्रस्ताव चौकशीधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) नामपाडा (कुतरकुंड)**
**धरणाच्या कामाच्या प्रगतीबाबत**

**(४४) ८४३३ (०७-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) नामपाडा (कुतरकुंड) धरणाच्या कामाची प्रगती व सद्यःस्थिती काय आहे,
(२) तसेच, या धरणाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात आली व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, या धरणाचे काम संथगतीने सुरु आहे हे खरे आहे काय व त्याची कारणे काय,
(४) असल्यास, या धरणाचे काम किती शिल्लक आहे व त्यावर किती खर्च अपेक्षित आहे,
(५) असल्यास, या धरणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :** (१) नामपाडा धरणाचे मातीकाम ३५ टक्के पूर्ण झालेले आहे. वनप्रस्तावास तत्वत: मान्यता मिळाली आहे. परंतु अंतिम मान्यता न मिळाल्याने एप्रिल २०१२ पासून काम बंद आहे.
(२) धरणाचे कामास फेब्रुवारी, २०१० पासून सुरुवात करण्यात आली, मार्च, २०१५ पर्यंत धरणाचे कामासाठी रु.६९६.५९ लक्ष इतका खर्च झाला असून प्रकल्पावर एकूण ११७७.३१ लक्ष (वन जमिनीची एनपीव्ही धरुन) इतका खर्च झाला आहे.
(३) नाही, धरणाचे काम एप्रिल, २०१२ पासून बंद आहे. प्रकल्पासाठी अपवश्यक वनजमिनीसाठी पर्यायी जमीन हस्तांतरण अद्यापपर्यंत पूर्ण न झाल्याने वन विभागास अंतिम मान्यतेचा प्रस्ताव सादर करता आला नाही. अंतिम मान्यतेनंतर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) धरणाचे ६५ टक्के कम शिल्लक आहे व त्यास २०११-१२ च्या दरसुचीनुसार अंदाजे रु.१२ कोटी. इतका खर्च अपेक्षित आहे.
(५) पर्यायी वन जमीन हस्तांतरण पूर्ण झाल्यावर वनजमिनीचा अंतिम मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे सादर करण्यात येईल. सदरहु मान्यतेनंतर प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येईल.

---

**मुंबईती बोरीवली येथील जेबीसीएन शाळेमध्ये प्रवेशाच्या वेळी पालकांकडून ५० ते ६० हजार रुपयांच्या दरम्यान शुल्क आकारले जात असल्याबाबत**

**(४५) ८४४६ (०९-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली येथील जेबीसीएन शाळेमध्ये प्रवेशाच्या वेळी पालकांना शाळेत पायाभूत सुविधा व उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी ५० ते ६० हजार रुपयांच्या दरम्यान शुल्क आकारले जात असल्याची धक्कादायक बाब दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे पायोनिअर आणि नॉन पायोनिअर असे गट केले व पायोनिअर गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना ६८ हजार व नॉन पायोनिअर गटातील विद्यार्थ्यांना १ लाख १७ हजार रुपये शुल्क आकारुन एकाच वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शुल्कावरुन भेदभाव करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१५) :** (१), (२), (३) व (४)

होय, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालानुसार शाळा बांधकामाच्या वेळी ज्या पालकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश घेऊन शाळेच्या उभारणीस हातभार लावला अशा पालकांना फी मध्ये सवलत देण्यात येते (पायोनिर बॅच) आणि जे पालक शाळा उभारणी झाल्यानंतर प्रवेश घेत असतील तर अशा बॅचला नॉन पायोनिर बॅच असे संबोधून त्यांच्याकडून पायोनियर बॅचपेक्षा जास्त फी आकारली जात आहे, असे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) २०११ अधिनियम दिनांक २१ मार्च,२०१४ रोजी अधिसूचनेद्वारा प्रसिध्द करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने सदर अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सदर शाळेस देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्याच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(४६) ८४७७ (०८-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),**

**श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेत २ लाख २० हजार अंगणवाडी महिला कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मिनीसेविका कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून अंगणवाडी सेविकांना मानधनात वाढ देण्याचे आदेश शासनाने काढूनही उक्त रक्कम अदा केली नाही, तसेच माहे ऑक्टोबर, २०१४ पासून शासनाने मानधनही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अनुषंगाने अंगणवाडी सेविकांना मानधन व वाढीव मानधन सुरु करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०७-२०१५) :** (१) राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ९५,३४१ अंगणवाडी सेविका, ९,८९८ मिनी अंगणवाडी सेविका व ९२,०२३ अंगणवाडी मदतनीस असे एकूण १,९७,२६२ अंगणवाडी कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) दिनांक ३० एप्रिल, २०१४ चे शासन निर्णयान्वये अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनात अनुक्रमे ९५०/-, ५००/- व ५५०/- एवढी वाए दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात तरतूद मंजुर केल्यानंतर भागविण्यात यावा असे नमूद करण्यात आले आहे. तथापि सन २०१४-१५ मध्ये अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध न झाल्यामुळे मानधन वाढ अदा करणे शक्य झाले नाही.

तसेच मानधन देणे बंद केले हे खरे नाही. सन २०१४-१५ मध्ये पुरेसा दराने नियमित मानधन या बाबीकरीता पुरेसा निधी प्राप्त न झाल्याने मानधन अदा करण्यात विलंब झाला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये नियमित मानधनाकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. वाढीव मानधन दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील**
**अधिव्याख्यातांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(४७) ८४८० (०८-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे अधिव्याख्यातांची बरीच पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. शासकीय तंत्रनिकेतन खामगाव येथे अधिव्याख्यात्यांची एकूण ४५ मंजूर पदे असून त्यापैकी २३ पदे नियमित केलेली आहेत व २२ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या पदांवर कंत्राटी अधिव्याख्यात्यांची तसेच तासीका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करुन अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही. राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पेठ खामगांव (ता. खामगांव, जि.बुलडाणा) अंतर्गत आलेले**
**नगर परिषद हद्दीबाहेरील हंसराज नगरचा भाग जयपूर**
**लांडे ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत**

**(४८) ८४९४ (०७-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. सुरेंद्रकुमार वल्लभदास पुरोहीत, रा. “नर्मदा”, हंसराज नगर, शेगांव रोड, खामगांव, जि. बुलडाणा यांनी तसेच श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दि. २२/८/२०१३ रोजीच्या निवेदनानुसार व पत्रानुसार हंसराज नगर हा भाग जयपुर लांडे या गांवात समाविष्ट करुन घेणेबाबत मागणी केली होती, हे खरे आहे काय, (२) याबाबत मौजे जयपुर लांडे या ग्रामपंचायतीने भाग सदर ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत ठराव मंजूर केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हंसराज नगर हे त्रिशंकु क्षेत्र हे महसूली गांव म्हणून जाहीर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दि. १० डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे हा प्रस्ताव मागील ३ महिन्यापासून प्रलंबित असल्याची कारणे काय,
(५) हंसराज नगर, ता. खामगांव या भागाला तात्काळ जयपुर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत शासन तात्काळ जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना आदेश देणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.
(४) व (५) हंसराज नगर, ता. खामगाव या भागाला जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेसंदर्भात नियमानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव दि. २७.१.२०१५ रोजी उप अधिक्षक भूमि अभिलेख, खामगांव यांचेकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर उप अधिक्षक भूमि अभिलेख, खामगांव यांचा तपासणी अहवाल दि. ०९.०४.२०१५ रोजी प्राप्त झाला आहे. सदरील भाग खामगाव हद्दीपासून किती दूर आहे, याबाबतचा अहवाल नगर रचनाकार यांचेकडून मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नगर परिषद, खामगाव पासूनचे अंतर लक्षात घेऊन सदरचा भाग नगर परिषद, खामगाव मध्ये समाविष्ट करावयाचा की, स्वतंत्र महसुली गाव घोषित करायचे याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

---

## श्रीराम एज्युकेशन सोसायटी, खामगांव, जि.बुलढाणा द्वारा संचालिक निवासी मुकबधिर विद्यालय यांचे प्रस्तावासा मंजुरी देण्याबाबत

**(४९) ८५०३ (०९-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीराम एज्युकेशन सोसायटी, खामगांव, जि.बुलढाणा द्वारा संचालित निवासी मुकबधिर विद्यालय यांचे प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत श्री. पांडुरग फुंडकर, वि.प.स. यांनी पत्राद्वारे मा.मंत्री सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने शाळेला मान्यता प्राप्त विनाअनुदानी ७५ विद्यार्थ्यांना अनुदान व शाळा संहितेप्रमाणे कर्मचारी पदास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास शासन मंजुरी देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-०७-२०१५) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वडगाव गुंदा( ता.गेवराई, जि. बीड) येथील शेतक-यास एमआरइजीएसच्या माध्यमातून विहिरीचे पैसे न मिळाल्याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याबाबत**

**(५०) ८५११ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील गेवराई मतदार संघातील मौजे वडगाव गुंदा येथील श्री.नवनाथ एकनाथ गव्हाणे या शेतक-यास एमआरइजीएसच्या माध्यमातून विहीर मंजूर होऊन त्यांनी विहिरीचे काम पूर्ण केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरीचे काम पूर्ण केले असतानाही त्यांना पैसे न मिळाल्याने श्री.गव्हाणे या शेतक-याने आपल्या शेतीमध्ये दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी गेवराई मतदार संघामध्ये अनेक शेतक-यांनी आत्महत्या केल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार विहिरीच्या बिलासंदर्भात शेतक-यांला ज्या कर्मचा-यांनी बिले वेळेवर दिली नाहीत, त्यांची चौकशी करून त्यांच्यावर शासन कोणत्या स्वरूपाची कारवाई करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
श्री.नवनाथ एकनाथ गव्हाणे रा.मौजे वडगाव (गुंदा), या शेतक-यांच्या नावे महात्मा गांधी राष्ट्रयी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसिंचन विहिर मंजूर झालेली नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.